Chapter-5



# प्रकरण ५ वें.

## आत्मचरित्रकारांचे देव आणि दैव या विषयी विचार.

देव आणि दैव हे विषयच असे आहेत की त्या विषयी जितके बोलावें तितकें थोडेंच आहे. या विषयी प्रत्येकाला थोडेंफार तरी कुतुहल असणें अगदी शक्य आहे. म्हणून या विषयी काही आत्मचरित्रकारांनी जें लिहून ठेवलें आहे तें येथे देण्यात येत आहे. त्यावरून काय बोध घ्यावयाचा हें वाचकांनीच ठरवावें.

### १ तुम्ही ईश्वराचें भय धरीत जा

परमेश्वरावर श्रद्धा ठेवा असें बाबा पदमनजी सांगतात.

(१) " मी फ्री चर्च विद्यालय सोडतेवेळी शिक्षकाच्या नात्याने माझ्या वर्गातील मुलांशी बोधपर भाषण केलें. त्यांतील खालील उतारा धर्म संबंधी आहे.

आता माझे मित्रहो, मी तुम्हास शेवटली गोष्ट सांगतों. ती तुम्ही सर्वदा ध्यानांत ठेवावी व तिजप्रमाणें चालावें. इतका वेळ मी जें सांगितले तें सर्व या शेवटल्या गोष्टी शिवाय व्यर्थ होईल. ती गोष्ट ही की तुम्ही सदा सर्वकाळ ईश्वराचें भय धरीत जा. सर्वकाळ ईश्वर तुमच्या सन्निध आहे असें मनांत वागवा. व जें सर्व तुम्ही करिता तें तो पाहतो व त्याचा न्याय करील

(१) ' अरुणोदय ' - बाबा पदमनजी - पृष्ट ११५.११६

असें समजा. पाहा ईश्वराचे तुम्हावर सदा सर्वकाळ किती उपकार आहेत. त्याच्या शक्तीने तुम्ही हालता, चालता व सर्व कामें करिता. तुम्हास आईबाप, अन्नवस्त्र व दुसऱ्या हजारो सोई कोणी दिल्या? तर अशा दयाळू परमेश्वरास कधीं विसरू नका. या शाळेंत राहिल्यानें सरकारी शाळेपेक्षा तुम्हास सर्वांहून मोठा लाभ झाला आहे. त्याविषयीं तुम्ही परमेश्वराचे बहुत आभारी व्हावे. ईश्वराविषयीं तुम्हास दररोज येथे उपदेश ऐकाव्यास मिळतो. ईश्वर कसा आहे, त्याचे गुण काय आहेत, त्याने आपणास कशाकरिता उत्पन्न केलें व त्याशी आपण कसें वागावें, त्याची कृपा कशी संपादन करून घ्यावी व आपल्या पापाची क्षमा कशी मिळेल इत्यादि मोठ्या अगत्याच्या व अमोल गोष्टींचें ज्ञान तुम्हास एथें प्राप्त होत आहे. सर्व ज्ञानापेक्षां व सर्व माणकांमोत्यापेक्षा हें ईश्वरीज्ञान अति मोलवान आहे. याची जरी तुम्हास आता किंमत समजत नाही, तरी पुढे थोड्याच काळांत तुम्हास त्याची गोडी लागेल. मग असें वाटेल की जेथे हें ज्ञान प्राप्त होत नाही अशा शाळेंतील जे विद्यार्थी ते किती गरीब असावे! त्यांची तुम्हास दया येईल. त्यांची पुष्कळ व गहन विद्या तुमच्या थोड्याशा व सोप्या विद्येपुढेही निस्तेज दिसेल. तर हे मित्र हो! ईश्वराविषयीं जी सत्यता तुमच्या कानीं पडते, ती विसरू नका. परंतु पुढे तुम्हास अधिक विचार व ज्ञान प्राप्त झालें म्हणजे सत्य कोणतें व मिथ्या कोणतें याचा भेद समजू लागेल, व कोणतें ग्रहण करावें व कोणतें त्यजावें हें तुमची बुद्धीच तुम्हास सांगेल. सारांश ही ईश्वराविषयींची गोष्ट तुम्हास शेवटीं सांगितली, कारण ती सर्वांपेक्षा मोठ्या अगत्याची आहे. आता माझे मित्र हो, मी पुन्हा तुम्हास शिकविण्यास येईन असा संभव नाही. मी तुम्हास सोडून जाण्यास बहुत खेदी आहे. परंतु ईश्वराची इच्छा जों पर्यंत म्यां एथें राहावें अशी होती तो पर्यंत राहिलों. आणि आता जरी मी

तुम्हापासून काहीसा दूर जातों तरी माझ्या हृदयांतून तुमची आठवण व प्रीति कधी जाणार नाही, व तुम्हीही मला विसरणार नाही अशी माझी आशा आहे. आता ईश्वर तुमचें कल्याण करो. तो तुम्हास विद्या शिकण्यास बुध्दि व बळ देवो व त्याच्या आशिर्वादाने तुम्ही सर्वदा सुखी राहा, म्हणजे तुम्हाविषयी माझी इच्छा पूर्ण होईल."

२ — ईश्वरावर भरवसा ठेवा

न्यायमूर्ति रानडे यांचे पणजे परमेश्वरावर निष्ठा ठेवून वागत ...

(१) " अप्पाजी भगवंत हे स्वतःचे ( म्हणजे न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांचे)सख्खे पणजे होते. श्रीचिदंबरस्वामी म्हणून जे कर्नाटक प्रांतात प्रसिध्दीस आले होते ते आमच्या अप्पांचे गुरु होते. अप्पांना आपला मरणकाळ माहीत होता असें म्हणतात. मरणाच्यापूर्वी सहामहिने अगोदरपर्यंत ते मोठ्या घोड्यावर चटकन बसत असत. दात व इतर गात्रें शेवटपर्यंत शाबूत होतीं. ते आपला सर्व वेळ ईश्वरध्यानात व चिंतनांत घालवीत व मुखाने नामस्मरण करीत. ते आपल्यावयाच्या पंचाण्णवाव्या वर्षी मुखाने नामस्मरण करीत असल्याअसल्याच कैलासवासी झाले. देहावसान होण्यापूर्वी त्यांनी आपल्या पुत्राला आपला निधनकाळ सांगून ठेवला होता असें म्हणतात. "

---

(१)' आमच्या आयुष्यांतील आठवणी '

– रमाबाई रानडे – पृष्ठ ३

३ : त्यांत आपलें कल्याण आहे

न्यायमूर्ति रानडे यांची परमेश्वरावर मोठी श्रद्धा होती ...

(१) " इतकें बोलणें झालें तरी खाली बसणें झालें नाही. तेव्हा मी आर्जवाने म्हटलें "थोडा वेळ खाली बसायाचे नाही का, किती तरी दम लागला आहे !"

तेव्हा म्हटलें " कोणाला दम लागला आहे ? मला ? मी बिलकूल दमलों नाही. मुळी पुरुषांचा जन्म श्रमाचीं कामें व कष्ट करण्याकरिताच आहे. आम्हाला दम लागून कसें चालेल. दऱ्या खोऱ्यांतून व डोंगर कपारींतून हिंडणारी आम्ही माणसें. तूं दमली आहेस म्हणून रदबदली करीत आहेस. मग मी दमलें आहे असें स्पष्ट म्हण, म्हणजे तुझ्याकरिता मी खाली बसतों.

मी लागलीच म्हटलें "होय, मी खरीच दमलें आहे. माझ्याकरिता का होईना पण खाली बसावें."

मग सडकेच्या कडेला पांढरे दगड ओळीने लाविलेले असतात, त्याजवर आम्ही ओणवता बसलों. गाडी येण्याला पुष्कळ अवकाश होता. म्हणून त्या दोन ईंगळ्यांची गोष्ट मी सांगितली. ती ऐकून म्हटलें, " आता तुझा घाबरलेला आवाज व भ्यालेली मुद्रा पाहून मला चमत्कारिक वाटले व गाडीबद्दल काळजी वाटली."

मी म्हणालें " केवढे तरी आज अरिष्ट टळलें ! ईंगळ्यांना नुसत्या पायाचा स्पर्श झाला असता तरी त्या चावल्या असत्या. मग काय वाट झाली असती ? अशा ऐन तिन्ही सांजच्या वेळी आडरानांत औषध कोठून मिळणार होतें ? अशावेळी कोण सहाय्य झालें असतें ?" असें बोलत असतांना मला गहींवर आला व एकदम रडेंही आलें.

(१) 'आमच्या आयुष्यांतील आठवणी' - रमाबाई रानडे - पृष्ठ १८०,१८१

तेव्हा स्वतः थोडावेळ अगदी स्तब्ध राहून मग मला म्हणाले, " आता अरिष्ट टळलें आहे ना ? आता भिण्याचें कारण काय आहे ? यावरून असें पहा की परमेश्वर सदोदित आपल्या सन्निध आहे व पावलो पावली आपल्याला सांभाळीत आहे. ईंगळ्यावर पाय न पडता जें पाऊल सहज पलीकडे गेलें असें तुला वाटतें तें कसेंही असलें तरीही योजना त्याचीच आहे. त्याने रक्षण करण्याचें मनांत आणल्या वर कोणाकडूनही अपाय होणें शक्य नाही. मात्र आपण तसा भाव ठेवला पाहिजे. हें शिकण्यासारखें नाही काय ? तुकाराम बुवांचा एक अभंग आहे " जेथें जाई तेथे तूं माझा सांगाती | चालविसी हातीं धरूनीया ||" हा अभंग किती सत्य आहे बरें ! धन्य ते पुरुष आणि त्यांचा निस्सीम भाव. आपल्याला जेव्हा अनुभव येतो तेव्हाच ती युक्ति पटते. आपण दुर्बल माणसांनी त्यांच्यासारखा दृढभाव मनांत धरला तर तें एक अत्यंत मोठें सामर्थ्य आहे व त्यांत आपलें कल्याण आहे. "

## ४ मी देवपूजा केली नाही

आनंदीबाई कर्वे मात्र म्हणतात की मी कधीच देवपूजा केली नाही.

( १ ) " माझे देवासंबंधी विचार अजून नक्की झालेले नाहीत आणि ते होतील असेंही वाटत नाही. मला वाटतें ज्याला सामान्य लोक देव म्हणतात व त्याची पूजा करतात तो काही देव नाही. त्या देवळातल्या देवावर माझा विश्वास नाही. सामान्य माणसाच्या मनाला समाधान वाटायला देवाची जरूरी असेल. पण मी कधी देवपूजा केलेली नाही. देवळांत गेलेली नाही किंवा पुण्य मिळविण्यासाठी उपासतापासही केलेले नाहीत.

---

( १ ) ' माझें पुराण ' - आनंदीबाई कर्वे - पृष्ठ १२५.१२६

माझे दादा तर नास्तीकच होते. त्यांचा देवावर विलकूल विश्वास नव्हता. ते मला म्हणत' देव जर दयाळू आहे तर त्याने तुला विधवा कां केली ? आणि जर तो खराच कनवाळू असेल तर त्याची पूजाबीजा नाही केली तरी चालेल. तो आपल्या लेकरावर कृपा करीलच ! "

५

ईश्वरी इच्छेचा आदर केला पाहिजे

नारायण वामन टिळक यांचा ईश्वरावर भरवसा होता. म्हणून ते म्हणतात ...

(१) " एखाद्या बाईचा नवरा मेला की ती दुःखातिरेकाने मूर्ख बनते. आपल्यावर मुलाबाळासंबंधी काही जबाबदारी आहे हें ती विसरून जाते. वाटेल त्यावेळेस वाटेल तेथे ती रडत बसते. आपल्या शोकाचा परिणाम कोणा-कोणावर होतो आहे इकडे तिचें कधी लक्षच रहात नाही. आणि दुःखाचें समाधान करण्यास ज्या आयाबाया येतात त्या तर मेलेल्या माणसाचे असतील नसतील ते गुण आठवून तिच्या शोकाग्नींत आणखी तेल ओतीत असतात. तिचें समाधान करण्याचें बाजूसच राहतें. मृतांच्या आप्तांना कोणती गरज आहे, त्यांचें सहाय्य कसें करता येईल, आपल्या दुःखाचा त्यांना कसा विसर पडेल, इकडे कोणाचें लक्ष नसतें. ज्याने त्याने तिला रडवावें, दुःखाच्या खपल्या काढाव्या, दिवसभर माणसांनी यावें दिवसभर वेळेस रडावें व घरांतील वातावरण कायमचें उदास करून टाकावें. त्या बाईचे डोळे रडून रडून फुटतात व मुलाबाळांच्या शरीर प्रकृतीवर परिणाम होतो."

---

(१) ' स्मृति चित्रे ' भाग ३ रा - लक्ष्मीबाई टिळक पृष्ठ १४३ १४४

" पुरे हें तुमचें चऱ्हाट. मला तें मुळीच आवडत नाही. कशी वेळ येईल ठाऊक नसते. नेहमी शुभ बोलावें. घरा भोंवती देवाचे दूत असतात. ते अस्तु अस्तु म्हणतात. " तेव्हा ते म्हणत,

"मी काय वाईट बोलतों आहे ? दोन प्रवासी वाटेने जातात. एकाचें स्टेशन आधी येतें, एकाचें मागाहून येतें. त्यांत काय आहे ? भिण्यासारखें काय झालें ? मी आपला बोलायला काही विषय हवा म्हणून विषय काढला आणि त्यांत वाईट काय झालें ? कोणती वेळ केव्हा येणार हें का ठाऊक असते ? आधी तशी नोटीस थोडीच येते ? लेकराला बाहेर किती वेळ राहू द्यायचें हें एक आईलाच कळतें. तें खेळून दमलें थकलें की ती पुढे होऊन त्याला उचलून आपल्याजवळ घेते. त्याला विसावा देते. तसेंच देव करतो. आज नाही उद्या तो असाच प्रत्येकाला उचलून घेईल. आपण त्यावेळेस हातपाय झाडण्याऐवजी त्याची उत्सुकतेने वाट पहायला हवी. मनुष्याने आपल्या परिस्थितीहून एक मूठभर मोठे व्हायला पाहिजे. नाहीतर दोघापैकी एक गेल्यावर मागे राहणाराने रडत बसणें म्हणजे त्या परिस्थितीचे गुलाम होणें व ईश्वरी इच्छेचा अनादर करणें आहे. "

## ६ मी देवपूजा करीत नसे

जनरल नानासाहेब गणपतराव शिंदे म्हणतात की मी देवपूजा करीत नसे.

(१) " मी रोज देवपूजा करीत नसे किंवा नितनेमाने काही प्रार्थनाही करीत नसे. मी नास्तिक नसून ईश्वर आहे ही गोष्ट मानणारापैकी एक आहे. परंतु नुसत्या त्या मूर्तीची पूजा केली म्हणजे ईश्वर प्रसन्न होतो असें मानणारापैकी

(१) -' एका शिपायाचें आत्मवृत्त ' - ... नानासाहेब गणपतराव शिंदे पृष्ट १५८

मी नाही. मी केव्हाही ब्राम्हणांच्या पाया पडत नाही. विद्वान् असल्यास त्यास नमस्कार करतो. वडील माणसांच्या मात्र पाया पडण्यात मला अभिमान वाटतो. मी केव्हांही उपवास करीत नाही. घरातील मंडळींनी उपवास केल्यास मी त्यास बिलकूल हरकत करीत नाही. त्या दिवशी मीही फराळाचें खातो. माझी दोन्ही कुटुंबें दररोज घरच्या देवांची पूजा करीत असत. त्यास माझी बिलकूल हरकत नसे. स्त्रियांनी कुलाचार व देवधर्म पाळावा. कुटुंबाने सत्य-नारायण केल्यास मी केव्हाही पूजेस बसत नाही. त्यास ब्राम्हण न मिळाल्यास सत्यनारायणाची पोथी वाचून दाखविण्यास माझी केव्हाही हरकत नसते. सन १९१३ साली जनरल बर्डवुडबरोबर ब्रिगेड मेजर या नात्याने मी काठेवाडांत गेलों. त्यावेळी धोळा स्टेशनवर निजतेवेळी प्रार्थना करतांना मी साहेबास पाहिलें. त्यांनी मला विचारलें की तुम्ही निजण्यापूर्वी ईश्वराची प्रार्थना करता की नाही? मी 'नाही' असें पटकन उत्तर दिलें. त्यावर त्यांनी सांगितलें की हें चांगलें नाही. प्रत्येक मनुष्याने निदान निजण्यापूर्वी आपल्या ईश्वरास आठवावें. मला साहेबाचें म्हणणें पटलें व त्या रात्रीपासून दररोज निजण्यापूर्वी मी देवाची प्रार्थना करूं लागलो. अद्याप पावेतों फक्त रात्रीच्या प्रार्थने शिवाय दुसरी कोणतीही उपासना मी करीत नाही. देवालयांत मी गेल्यास देवास नमस्कार करतो. रामदास तुकाराम वगैरे साधूंचे अभंग मी मोठ्या प्रेमाने वाचतो व कित्येक वेळा त्यांत तल्लीनही होतो. मला बरेच अभंग तोंडपाठ येतात ते मी नेहमी फुरसतीच्या वेळी मनामध्यें गुणगुणतो. गुरू करून त्याच्यामागे मी केव्हाही धावलों नाही. हे लोक लुच्चे, लफंगे, मोंदू व ढोंगी असतात असा माझा अनुभव आहे. जसा ज्योतिषावर माझा विश्वास नाही तसाच अशा लोकांवरही माझा बिलकूल भरवसा नाही."

** ** **

## ७ " तुझा " म्हणजे ' मानवी कर्तव्याचा '

' मानवी कर्तव्य ' म्हणजेच परमेश्वर असे इतिहासकार गो.स.सरदेसाई सांगतात.....

(१) " दैव, परमेश्वर इत्यादि काय कल्पना आहेत त्यांचें आकलन मला होत नाही. मला इतकेंच कळतें की आपण जन्मास आलों खरे आणि आपणाला बरें वाईट ओळखण्याची अक्कलही आहे. मग ही अक्कल वापरून भलेपण मिळविणें हेंच आपलें कर्तव्य आहे. हें कर्तव्य प्रत्येकाला साध्य असून त्यावरच समस्त मानवी संसार आधारलेला आहे. तुकाराम बोवांनी तरी देवाजवळ दुसरें काय मागितलें. " न लगे मुक्ति धनसंपदा ! संत संग देई सदा !! " देवाची ही देणगी मला भरपूर लाभली असें मी मानतों. ' सतांसद्भिः संगः कथमपि हि पुण्येन भवति ' या न्यायानें माझी या जगांतील पुण्याई मला लहान वाटत नाही. माझ्या पितृमातृ कुळांत हिणकस असें कांही नव्हतें. समजूं लागल्यावर शैक्षणिक व्यवसायांत मला गुरु म्हणून भेटले ते यच्चयावत् वंदनीय होते. पुढे कौटुंबिक संबंध जडले ते सर्व सद्गुणी व श्रेयस्कर बनले. प्रथम बापुसाहेब आठल्ये व उत्तरायुष्यांत सर जदुनाथ सरकार ह्यांचें मार्गदर्शन मला लाभलें आणि प्राप्त परिस्थितींत हा लाभलेला नरदेह मी सत्कारणीं लावला हें समाधान कांही लहान नाही. ' तुझा विसर न व्हावा ' हीच मागणी मी तुकाराम बोवाप्रमाणें सदैव मागत राहीन. ' तुझा ' म्हणजे ' मानवी कर्तव्याचा ' एवढाच बदल फार तर मी करीन. हेंच माझें तत्वज्ञान. "

---

(१) ' माझी संसार यात्रा ' ... गो.स.सरदेसाई ...

८

## विश्वास अढळ राहिला आहे

गोविंद सखाराम टेंबे यांचा मात्र ईश्वरावर विश्वास आहे.

(१) " मी आज यावेळी माझ्या आयुष्याचा आढावा घेत असतांना मला असें दिसून येत आहे की लाभ, हानी, सुखदुःख, यशापयश इत्यादि महत्त्वाच्या प्रसंगापासून तो नित्याच्या क्षुल्लक गोष्टीपर्यंत प्रत्येक बाबतींत यशाच्याशैलशिखरावरून मी निराशेच्या खोल गर्तेत आदळायचें आणि अचानक तेथून पुन्हा मला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने शिखरावर आणून बसवायचें. अशा सतत अनुभवामुळे बुद्धीच्या टोचणीविरुद्ध देखील माझा परमेश्वरावरील विश्वास अढळ राहिला आहे. आचारांत मी नास्तिकातला नास्तिक आहे आणि विचारामध्यें भावी पिढीच्याही पुढे आहे. मात्र पुरातन आचारविचारांनीं केवळ पुरातन म्हणून लाथाडायचें ही माझी वृत्ति नाही. परमेश्वर आहे की नाही, या विषयींची पंचाईत मी करीत नाही. पण तो मजेने मला खाली पाडतो, माझी धडपड पाहतो आणि मी हताश झाल्यावर कारुण्याच्या एका कटाक्षाने मला वर काढतो ही एकच भावना माझ्यांत दृढमूल झालेली आहे. आणि कोणत्याही कारणाने ती मुळांतून यत्किंचितही सुटलेली नाही. अर्थात् या विश्वासामुळे मी कोणत्याच गोष्टींचा विधिनिषेध मानीत आलों नाही. जें जें प्राप्त होईल तें तें भोगायचें त्याच्या परिणामाचा विचार करावयाचा नाही .. मग तो परिणाम इष्ट असो वा अनिष्ट असो. यामुळे कोणाचें बरें केलें हा अहंभावही नाही व कोणाचें वाईट व्हावें व माझें बरें व्हावें ही गाठून रुखरुखही नाही. मनांत आलेली गोष्ट योग्यच असणार, तेव्हा ती करायची; मग ती बरी असो की वाईट असो. वाईट असेल तर त्यांतून ईश्वरेच्छेनें आपोआप मुक्तता होईलच. तों पर्यंत ती मला मानवतेच. चांगल्या वस्तूला मी मुकलों तर

---

(१) ' माझा जीवन विहार ' ... गोविंद स.टेंबे .. पृष्ठ ७३.७४

त्याहीपेक्षा अधिक चांगली वस्तू मला मिळणार आहे, अशीही खात्री ठेवायची; आणि ती केवळ अंधविश्वासाची खात्री नव्हे, तर अनुभवाची खात्री. या मीमांसे-नंतर माझ्या वरवर दिसणाऱ्या बेपर्वा व बेगुमान बेछूट वृत्तीची तरफदारी करण्याचें क्वचितच कारण पडेल ! "

९ — उत्तर देणार नाही अशी आशा आहे

ईश्वरा विषयी नाटककार श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचे विचार पुढील प्रमाणे आहेत.

(१)" ईश्वराने दिलेल्या सामर्थ्याचा व कालाचा काटकसरीने उपयोग करणें हाच धर्म आहे व तो मी यथाशक्ति पाळीत आलों आहे. ईश्वराच्या चिंतनांत मी आजपर्यंत फारसा वेळ घालविला नाही. बाह्य किंवा आंतर असे अनेक चमत्कार आपल्या चर्म चक्षुपुढून किंवा मनश्चक्षुपुढून जात असता ईश्वरी शक्तीचें जें अनायासें चिंतन होतें त्यापेक्षा निराळेच चिंतन करण्याची मला आज पर्यंत कधींही जरूर भासली नाही. व त्याकरिता दयाळू परमेश्वर मला निर्वा.. णीच्या वेळीं कधींही उत्तर देणार नाही अशी खात्री आहे. "

१० — ज्योतिषावर भरवसा नाही

ज्योतिषावर जनरल नानासाहेब शिंदे यांचा भरवसा नव्हता म्हणूनच ते म्हणतात .....

(२) " एका अर्थी माझी जन्मपत्रिका नव्हती हें बरेंच झालें. माझा ज्योतिषावर फारसा भरवसा नाही. त्यामुळे माझे ग्रह चांगले किंवा वाईट हें .

---

(१) 'आत्मवृत्त' श्री.कृ.कोल्हटकर - पृष्ठ १४५

(२)' एका शिपायाचें आत्मवृत्त '- नानासाहेब गणपतराव शिंदे - पृष्ठ ७

पाहण्याचा अगर ज्योतिषास पत्रिका दाखविण्याचा मला केव्हांही प्रसंग आला नाही. ग्रहांनीं ग्रहांचें काम करावें व आपण आपलें काम करीत असावें. स्वतःची नीति चांगली असली व स्वकष्टाने आळस सोडून नेमाने काम करण्याची मनुष्यास सवय असली, म्हणजे त्याचा उर्जितकाळ आपोआपच येतो असें मानणारांपैकी मी एक आहे. नुसत्या जन्मपत्रिकेंतील चांगल्या ग्रहांवरून आपली ऊर्जितावस्था होतेच असें नाही. माझ्या जन्माचें साल मात्र वडिलांनी मला बरोबर सांगितल्याने तें चांगलें लक्षांत आहे. माझा जन्म सन १८७५ मध्यें झाला. "

## ११ : माझा दैवावर भरवसा

साहित्य सम्राट नरसिंह चिंतामण केळकर मात्र म्हणतात की माझा दैवावर भरवसा आहे.

(१) "प्रत्यक्ष व्यवहारांत मी उद्योगवादी असलों तरी स्वतः माझ्याच आयुष्यांत अशा कांही गोष्टी अकल्पित रीतीने घडलेल्या आहेत की मी आज आहे तो माझ्या उद्योगवादामुळे नसून माझ्या सुदैवामुळे आहे अशी स्पष्ट कबुली देण्याला मला कांहीच संकोच किंवा कमीपणा वाटत नाही. "

## १२ : हाही परमेश्वराचा अनुग्रह आहे

भाषाशैलीकार श्रीपाद महादेव माटे म्हणतात कीं ईश्वराच्या आशिर्वादामुळेच ' हें ' घडत आहे.

(२) " १९५५ च्या नोव्हेंबरच्या महिन्यांत मला कॅन्सरने गाठलें. तेव्हा पर्यंत रोज पहाटे ४ ।। पर्यंत मला अखंड झोप येत असे, व स्वप्न केव्हा तरी वर्ष सहा महिन्यांनी एखादेवेळी पडे ! यामुळे प्रकृति सुदृढ राहिलेली होती.

(१) ' गत गोष्टी ' .. न. चिं. केळकर - पृष्ठ ४६०

(२) ' मी व मला दिसलेलें जग ' .. श्री. म. माटे - पृष्ठ ४४७

कॅन्सरची घोरपड माझ्यावर कां यावी याचा शोध मी मनाने पुष्कळ केला; आणि सांगावयाचेंच झालें तर एक कारण सांगता येईल की चहा घ्यावयाचा तो मी फार कढत घेत असे, व त्यामुळे अन्ननलिकेंत कॅन्सरला अनुकूल भूमी सापडली असावी. पण हा केवळ माझा अंदाज आहे. हा रोग जडल्यापासून आज पावणे दोन वर्षे झालीं. त्याने व तज्जन्य उपाधींनी मी अगदी जर्जर होऊन पडलों आहे. तथापी मन व बुध्दि ही पूर्णपणे शाबूत असल्यामुळे मजकूर लिहून देण्याचे काम मी अजूनही करतो, हाही परमेश्वराचा अनुग्रह आहे."

१३ — त्याचें ऋण मी मानतो

पुढे पृष्ठ ४०९ वर श्री.म.माटे म्हणतात "मी १९१० साली इंटरमिजीएट नापास होऊन अठरा रुपयावर एका लहानशा खोलींत मास्तरकी करणाऱ्याला इतपत वैभव लाभलें हे ही मी भाग्यच समजतों. माझी भाग्यरेषा मला उंचावर नेता आली असती. पण त्यासाठी मला सद्सद्विवेक बुध्दि आणि स्वाभिमान यांची मान मुरगळावी लागली असती. वीस वर्षे पर्यंत दलित वर्गाची सेवा करण्याचें भाग्य मला लाभलें. आणि त्या कामीं तन मन धनेकरून मी अत्यंत सचोटीने झटलों. यामुळे तर मला शाश्वतेचें सुख लाभलें आहे. असो. झालें आहे तें सर्व चांगलेंच आहे. देवाने एकाहत्तर वर्षे पर्यंत मला जिवंत ठेवून आपलें हें सुंदर विश्व डोळाभर पाहू दिलें है त्याचें केवढें तरी ऋण मी मानतो. काही जीवित अजून उरलेलें असलें तर त्यांत काय घडून येईल हें मला कसें बरें सांगता येईल ! "

***　　***　　***

१४

## मूर्तिपूजा सोडून भूतदया धरली पाहिजे.

उद्योगरत्न श्री. वि.रा.वेलणकर म्हणतात की मूर्तिपूजा सोडून आपण भूतदया धरली पाहिजे. कारण भूतदया म्हणजेच परमेश्वराची पूजा.

(१) " आम्ही मूर्तिपूजेचे उपचार सोडून ज्या दिवशी भूतदयेतच आपल्या जीवाचे सार्थक आहे असे समजू त्या दिवशी हिंदुधर्म टिकेल. एरवी धडगत नाही. अशी माझ्या मनाची खात्री झाली. परक्यांना दया येते. ते संकटसमयी मदत करतात व आम्ही धर्मबंधू त्यांची मजा पाहतो. मग त्यांचे मनात आम्हाबद्दल बंधुभाव कसा निर्माण व्हावा? सारांश आपण आपल्या धर्म बांधवावर दया केली पाहिजे, त्याला संकटसमयी मदत केली पाहिजे. तरच भारतातील १५०० वर्षांपासूनचा कलह मिटेल. ख्रिश्चन धर्माची आर्य धर्मावर आज धाड येऊ पहात आहे ती टळेल व मग खरें रामराज्य होईल."

---

(१) ' मी कारखानदार कसा झालों ? '

श्री.वि.रा.वेलणकर ... [illegible]